30022

**GMPRDPC 2021** — प्रश्नपत्रिका संच कोड-C

वेळ : 90 मिनिटे | एकुण प्रश्न: 100 | एकुण गुण: 100 | दिनांक: 14/05/2023

आसन क्रमांक :

## सुचना

1. सदर प्रश्नपत्रिकेत 100 प्रश्न आहेत. उमेदवारांनी प्रश्नांची उत्तरे लिहिण्याची सुरुवात करण्यापूर्वी या प्रश्नपत्रिकेत सर्व प्रश्न आहेत किंवा नाहीत याची खात्री करुन घ्यावी. तसेच अन्य काही दोष आढळल्यास ही प्रश्नपत्रिका पर्यवेक्षकाकडून लगेच बदलून घ्यावी.
2. परिक्षा संपल्यानंतर उमेदवाराला स्वतःची प्रश्नपुस्तिका परिक्षाकक्षाबाहेर घेऊन जाण्यास परवानगी आहे. मात्र परिक्षाकक्षाबाहेर जाण्यापूर्वी उमेदवाराने आपल्या उत्तरपत्रिकेचा भाग-1 पर्यवेक्षकाकडे न विसरता परत करणे आवश्यक आहे.
3. प्रश्नपुस्तिकेमध्ये विहीत केलेल्या विशिष्ट जागीच कच्चे काम (रफ वर्क) करावे. प्रश्नपुस्तिके व्यतिरिक्त उत्तरपत्रिका वा इतर कागदावर कच्चे काम करु नये.
4. उत्तरपत्रिकेत एकदा नमूद केलेले उत्तर खोडता येणार नाही. नमूद केलेले उत्तर खोडून नव्याने उत्तर दिल्यास ते तपासले जाणार नाही.
5. उत्तरपत्रिकेतील उत्तर नमूद करताना फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल /जेल पेन /शाईचे पेन वापरू नये.
6. प्रश्नपत्रिका व उत्तर पत्रिकेवर स्वतःचे नाव लिहू नये अन्यथा उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल.
7. परिक्षा केंद्रात प्रवेश केल्यानंतर परिक्षा संपेपर्यंत बाहेर जाण्यास सक्त मनाई आहे.
8. उत्तरपत्रिका पाणी व धूळीपासून दूर ठेवावी. उत्तरपत्रिकेची घडी करु नये.
9. प्रश्नपत्रिकेवरील संचकोड पाहून उत्तरपत्रिकेवर लिहावा.

1. महाराष्ट्र राज्याला एकूण किती किलोमीटरच्या सागरी किनारा लाभलेला आहे ?
A) 620 कि.मी. B) 720 कि.मी. C) 516 कि.मी. D) 1214 कि.मी.

2. महाराष्ट्र पोलीस दलाचा स्थापना दिवस ( रेझिंग डे) कोणत्या दिवशी साजरा केला जातो ?
A) 8 मार्च B) 2 जानेवारी C) 1 मे D) 15 ऑगस्ट

3. भारतरत्न पुरस्कार मिळविणारी महाराष्ट्रातील पहिली व्यक्ती कोण ?
A) धोंडो केशव कर्वे B) पांडुरंग वामन काणे C) लता मंगेशकर D) सचिन तेंडुलकर

4. ग्रामगीता कोणी लिहिली ?
A) संत तुकडोजी महाराज B) संत तुकाराम C) संत ज्ञानेश्वर D) संत नामदेव

5. राज्यसभेचे पदसिध्द सभापती कोण असतात ?
A) राष्ट्रपती B) उपराष्ट्रपती C) पंतप्रधान D) उपपंतप्रधान

6. भारतातील सर्वात जास्त ज्युट उत्पादक राज्य कोणते ?
A) गुजरात B) तमिळनाडु C) पश्चिम बंगाल D) बिहार

7. ग्रॅमी पुरस्कार कोणत्या क्षेत्राशी संबंधित आहे ?
A) नाटक B) चित्रपट C) क्रीडा D) संगीत

टेलिग्राम लिंक

8. महाराष्ट्राचा राज्यप्राणी कोणता ?
A) वाघ B) सिंह C) शेकरु D) हरीण

9. महाराष्ट्रातील अष्टविनायकांच्या आठ स्थानांपैकी पाच स्थाने कोणत्या जिल्ह्यात आहेत ?
A) अहमदनगर B) रायगड C) रत्नागिरी D) पुणे

Scanned with OKEN Scanner

10. महाराष्ट्रातील आकारमानाने सर्वात लहान जिल्हा कोणता ?

A) मुंबई शहर B) लातूर C) गोंदिया D) वर्धा

11. फक्त 2 अंकी संख्यांमध्ये 7 हा अंक किती वेळा येतो ?

A) 20 B) 21 C) 19 D) 18

12. $\frac{3}{4}$ मध्ये किती मिळवावेत म्हणजे बेरीज $\frac{4}{3}$ येईल ?

A) $\frac{7}{12}$ B) $\frac{3}{12}$ C) $\frac{4}{3}$ D) $\frac{3}{4}$

13. खालीलपैकी सर्वात मोठा अपूर्णांक कोणता ?

A) $\frac{14}{24}$ B) $\frac{11}{15}$ C) $\frac{5}{8}$ D) $\frac{3}{5}$

14. 513, 1134 आणि 1215 चा म.सा.वि. किती ?

A) 27 B) 9 C) 81 D) 3

15. अशी लहानात लहान खालीलपैकी संख्या कोणती की जिच्यात 10 मिळविले असता, तिला 10, 20, 25 व 30 या संख्यांनी निःशेष भाग जाईल ?

A) 300 B) 280 C) 290 D) 310

16. एका रांगेत प्रत्येकी 10 फुट अंतरावर एक झाड आहे, तर 5 व्या व 1 ल्या झाडातील अंतर किती फुट असेल ?

A) 50 B) 40 C) 45 D) 55

17. चार क्रमवार विषम संख्यांची बेरीज 32 आहे, तर सर्वात लहान व मोठ्या संख्यांची बेरीज किती?

A) 12 B) 18 C) 16 D) 10

18. संजयची 5 विषयांतील गुणांची सरासरी 60.6 असून उरलेल्या 2 विषयांत त्याला 173 गुण मिळाले, तर त्याची 7 विषयांतील गुणांची सरासरी किती?

A) 68 B) 66 C) 65.6 D) 64.6

19. कोणत्या संख्येचा 20% हा 40 चा 30% आहे ?

A) 90 B) 80 C) 60 D) 50

20. एका गावची लोकसंख्या 12,000 आहे. ती दरवर्षी 10% ने वाढते. तर 3 वर्षानंतर ती किती होईल ?

A) 14342 B) 16873 C) 13343 D) 15972

21. एक वस्तु 2760 रुपयांना विकल्याने 20% नफा झाला तर त्या वस्तुची खरेदी किंमत किती?

A) रु. 2290 B) रु. 2300 C) रु. 2310 D) रु.2320

22. A:B = 3:4 आणि B:C = 8:9 तर A:C किती ?

A) 1:3 B) 3:2 C) 2:3 D) 1:2

23. 5 किमी/तास जाणारी व्यक्ती एक पूल 15 मिनिटात ओलांडते. तर त्या पुलाची लांबी किती?

A) 600 मीटर B) 750 मीटर C) 1250 मीटर D) 1000 मीटर

24. $\frac{14014}{16016}$ चे संक्षिप्त रुप कोणते ?

A) $\frac{3}{4}$ B) $\frac{7}{9}$ C) $\frac{91}{105}$ D) $\frac{7}{8}$

25. फळ बागेतील 150 झाडापैकी 12% झाडे आंब्यांची आहेत. तर बागेत इतर प्रकारची झाडे किती ?

A) 132 B) 138 C) 18 D) 24

26. द.सा.द.शे. 4 दराने 5000 रुपयाचे सरळव्याज मुद्दलीच्या दुप्पट होण्यासाठी किती वर्षे लागतील ?

A) 50 B) 5 C) 15 D) 20

27. तीन संख्यांपैकी पहिली व दुसरीचे गुणोत्तर 3:5 आहे. दुसरी व तिसरीचे गुणोत्तर 3:4 आहे जर 3 री संख्या 80 असल्यास पहिली संख्या कोणती ?

A) 60 B) 36 C) 32 D) 40

28. राजु व संजुने एक व्यवसाय सुरु केला. राजुची गुंतवणूक संजुच्या तिप्पट आहे. तर वर्षाअखेरीस त्यांना 52000 रु. नफा झाला तर त्यातील राजुचा वाटा किती ?

A) 39,000 B) 13,000 C) 26,000 D) 32,000

29. 15 माणसे एक काम 16 दिवसात पूर्ण करतात. जर तेच काम पूर्ण करण्यासाठी 24 माणसे कामाला लावली, तर ते काम किती दिवसात पूर्ण होईल ?

A) 7 दिवस B) 8 दिवस C) 10 दिवस D) 12 दिवस

30. जर 0.75 : x :: 5 : 8 तर X ची किंमत किती ?

A) 1.12 B) 1.20 C) 1.25 D) 1.30

31. जो अंबरी उफळता खुर लागलाहे।
तो चंद्रमा निज तनूवरि डाग लाहे॥
या काव्यपंक्तीतील अलंकार ओळखा ?

A) उपमा B) अतिशयोक्ती C) उत्प्रेक्षा D) रूपक

32. पर्यायी उत्तरांतील शुद्ध शब्द कोणता ?

A) अधीक्षक B) अधिक्षक C) आधीक्षक D) आधिक्षक

33. 'दिग्मूढ होणे' म्हणजे काय ?

A) भ्रमनिरास होणे B) मरण पावणे C) दुर्लक्ष होणे D) काय करावे ते न सुचणे

34. पेशवा, कामगार, खाकी, पोशाख हे शब्द कोणत्या भाषेतून आलेले आहेत ?

A) कन्नड B) अरबी C) फारसी D) यापैकी नाही

35. दोन शब्द जोडताना कोणते चिन्ह वापराल ?

A) अपसरण चिन्ह B) स्वल्पविराम C) अपूर्ण विराम D) संयोग चिन्ह

36. 'त्याची गोष्ट लिहून झाली' या विधानातील प्रयोग ओळखा ?

A) नवीन कर्मणी B) पुराण कर्मणी C) समापन कर्मणी D) शक्य कर्मणी

37. ज्या वाक्यात एक उद्देश व एक विधेय असते त्यास कोणते वाक्य म्हणतात ?

A) संयुक्त वाक्य B) केवल वाक्य C) मिश्र वाक्य D) जोडाक्षरयुक्त वाक्य

38. 'मला परीक्षेची भीती वाटते' या वाक्यातील अधोरेखीत शब्दाची विभक्ती ओळखा ?

A) सप्तमी B) व्दितीया C) चतुर्थी D) षष्ठी

39. पुढे दिलेल्या शब्दाचा स्त्रीलिंगी शब्द ओळखा 'बोकड'

A) बोकडीण B) बोकडी C) शेळी D) मेंढी

40. पुढील वाक्यातील काळ ओळखा. 'मुले शाळेत गेली आहेत.'

A) पूर्ण भविष्यकाळ B) पूर्ण वर्तमानकाळ C) पूर्ण भुतकाळ D) रिती वर्तमानकाळ

Scanned with OKEN Scanner

84. जर $\frac{a}{b} = \frac{9}{5}$ तर $\frac{a+b}{a-b}$ = ?

A) $\frac{5}{1}$ B) $\frac{14}{5}$ C) $\frac{2}{7}$ D) $\frac{7}{2}$

85. पाच अंकी लहानात लहान संख्येला तीन अंकी लहानात लहान संख्येने भागल्यास उत्तर काय येईल?

A) 10,000 B) 1,000 C) 100 D) 10

86. जर CUT = XFG , तर YES = ?

A) BWI B) BVH C) LRF D) LVH

87. A, D, I, P, ?

A) X B) Y C) Z D) A

88. रांगेतील समीरचा नंबर दोन्ही बाजूकडून पंधरावा आहे, तर रांगेत एकूण मुले किती ?

A) 20 B) 25 C) 29 D) 30

89. 12:30 वाजता तास काटा व मिनिट काटा यामधील कोण किती अंशाचा असेल ?

A) $180^0$ B) $90^0$ C) $165^0$ D) $175^0$

90. 50 मीटर लांबीच्या दोरीचे समान 10 भाग करण्यासाठी एकूण किती काप घालावे लागतील ?

A) 11 B) 12 C) 9 D) 10

91. भारतात राष्ट्रपतींच्या निवडणुकीत मतदार कोण असतात ?

A) लोकसभेचे निर्वाचित सदस्य

B) राज्यसभेचे निर्वाचित सदस्य

C) विधानसभेचे निर्वाचित सदस्य

D) वरील सर्व

92. भारताचे वायुदल प्रमुख कोण आहे ?

A) विवेक चौधरी B) मनोज नरवणे C) अनिल चौहान D) हरि कुमार

93. एक शिंगी गेंड्यासाठी कोणते राष्ट्रीय उद्यान प्रसिद्ध आहे ?

A) काझीरंगा B) नागरहोल C) शिवपूरी D) कान्हा

94. कोणत्या विमानतळाला शहीद भगतसिंह यांचे नाव देण्यात आले आहे ?

A) नांदेड B) लुधियाना C) चंदीगड D) हिसार

95. सिंधुताई सपकाळ यांचे आत्मचरित्र कोणते ?

A) नाच गं घुमा B) मी वनवासी C) स्वतः विषयी D) झिम्मा

96. या पैकी कोणता देश नाटो (NATO) या संघटनेचा 2023 मध्ये सदस्य बनला ?

A) फिनलँड B) अमेरिका C) तुर्की D) जर्मनी

97. भारत यजमानपद भुषवित असलेल्या G20 बैठकीचे घोषवाक्य काय आहे ?

A) अतिथी देवो भवः

B) वसुधैव कुटुंबकम

C) सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

D) वसुधैव कल्याणम्

98. नुकतेच निधन झालेले पंजाब राज्याचे माजी मुख्यमंत्री प्रकाशसिंह बादल हे कोणत्या राजकीय पक्षाचे प्रतिनिधीत्व करत होते ?

A) कॉंग्रेस B) आम आदमी पक्ष C) शिरोमणी अकाली दल D) भारतीय जनता पक्ष

Scanned with OKEN Scanner

41. 'माखर देताना सुभाष हसला' या वाक्यातील देताना हा शब्द -------- आहे.

A) विशेषण B) क्रियाविशेषण C) शब्दयोगी अव्यय D) क्रियापद

42. पुढील शब्द कोणत्या शब्दाच्या जातीचा आहे - 'बेजबाबदार'

A) नाम B) विशेषण C) क्रियापद D) क्रियाविशेषण

43. पुढील शब्दाची संधी फोड करा - 'सदाचार'

A) सत् + आचार B) सदा + आचार C) सद् + आचार D) सदा + आचार

44. पुढीलपैकी योग्य शब्द कोणता ?

A) प्रतिथयश B) प्रथितयश C) प्रतीतयश D) प्रथीतयश

45. पुढील म्हणीत योग्य शब्द भरा. 'आंधळे दळते नि कुत्रे -------- खाते'

A) मांस B) पोळी C) पीठ D) भाकरी

46. 'भावनेचा बांध फुटणे' या वाक्प्रचाराचा अर्थ सांगा ?

A) भांबावून जाणे.

B) निर्भयपणे सामोरे जाणे.

C) दाबुन टाकलेली भावना उफाळून येणे.

D) अतुट नातेसंबंध तोडणे.

47. 'प्रगती' या शब्दाचा विरुद्धार्थी शब्द ओळखा ?

A) अगती B) अधोगती C) उन्नती D) विकास

टेलिग्राम लिंक

48. 'नवरात्र' या सामासिक शब्दाचा विग्रह कसा होईल?

A) नवरात्रींचा समुह

B) नऊ रात्रींचा समुह

C) नऊ दिवस व नऊ रात्रींचा समुह

D) नवरात्रोत्सव

49. 'शिपायाकडून चोर पकडला गेला' या वाक्यातील प्रयोग ओळखा.

A) कर्तरी B) सकर्मक कर्तरी C) नवीनकर्मणी D) भावे

50. स, ला, ते, ---- ही प्रत्यये कोणत्या विभक्तीची आहेत ?

A) द्वितीया - चतुर्थी B) तृतीया-चतुर्थी C) पंचमी - षष्ठी D) षष्ठी-सप्तमी

51. शिकाऊ ड्रायव्हिंग परवान्याची वैधता किती कालावधीसाठी असते ?

A) सहा महिने B) एक वर्ष C) पाच वर्ष D) सहा वर्ष

52. झेब्रा क्रॉसिंगचा अर्थ काय आहे ?

A) मोटार वाहनाने या ठिकाणी थांबू नये.

B) प्राण्यासाठी रस्ता पार करण्याची जागा.

C) पादचा-यांनी या ठिकाणी थांबू नये.

D) पादचा-यांसाठी रस्ता पार करण्याची जागा.

53. मोटार वाहन अधिनियमानुसार मद्य (दारु) प्राशन करुन वाहन चालवणे कोणत्या कलमानुसार अपराध आहे ?

A) मोटार वाहन अधिनियम कलम 184

B) मोटार वाहन अधिनियम कलम 185

C) मोटार वाहन अधिनियम कलम 186

D) मोटार वाहन अधिनियम कलम 187

54. PUCC चा अर्थ काय ?

A) पोलुशन अंडर कंट्रोल कार अँड करियर

B) पोलुशन अंडर कंट्रोल सर्टिफिकेट

C) पोलुशन अनकंट्रोल सर्टिफिकेट

D) पोलुशन युनिव्हर्सिटी कॉलेज सर्टिफिकेट

55. तीन मार्गिका असणा-या द्रुतगती मार्गावरील सर्वात उजव्या बाजूची मार्गिका कशासाठी वापरली जाते ?

A) केवळ दुचाकी वाहनांसाठी

B) ओव्हरटेक करण्यासाठी

C) केवळ जड वाहनांसाठी

D) यापैकी नाही



Scanned with OKEN Scanner

70. प्रदूषण नियंत्रण प्रमाणपत्राची विधीग्राह्यता किती असते ?

A) 6 महिने B) 1 वर्ष C) 2 वर्ष D) $1\frac{1}{2}$ वर्ष

71. A, C, F, J, O, ?

A) V B) T C) S D) U

72. $\frac{G}{7}, \frac{J}{10}, \frac{N}{14}$, ?

A) $\frac{T}{20}$ B) $\frac{S}{18}$ C) $\frac{T}{19}$ D) $\frac{S}{19}$

73. 106, 86, 68, 52, 38 ?

A)24 B) 28 C) 30 D) 26

74. 4, 16, 36, 64, 100, 144 ?

A) 144 B) 196 C) 121 D) 169

75. 3, 10, 15, 26, 35, 50 ?

A) 65 B) 62 C) 63 D) 64

76. 240, 240, 120, 40, 10 ?

A) 5 B) 1 C) 4 D) 2

77.

| Top | Left | Centre | Right | Bottom |
|---|---|---|---|---|
| 3 | 1 | 10 | 5 | 4 |
| 4 | 2 | 24 | 6 | 3 |
| 6 | 3 | 42 | 7 | 2 |
| 5 | 4 | ? | 8 | 3 |

A) 48 B) 80 C) 72 D) 40

78.

| Top | Bottom left | Bottom right |
|---|---|---|
| 49 | 14 | 7 |
| 78 | 13 | 12 |
| ? | 17 | 18 |

A) 70 B) 162 C) 153 D) 136

79. एका सांकेतिक भाषेत 'EAST' हा शब्द 'GCUV'असा लिहितात. तर त्या भाषेत 'NORTH' हा शब्द कसा लिहिला जाईल ?

A) OPSUI B) PQSVI C) OQUYL D) PQTVJ

80. मधु दिलीप पेक्षा 12 वर्षांनी लहान आहे. तर 6 वर्षानंतर त्यांच्या वयांतील फरक किती होईल ?

A) 24 वर्ष B) 12 वर्ष C) 6 वर्ष D) 18 वर्ष

81. अमेयचे वय चिन्मयच्या वयाच्या 1/3 पट आहे. दोघांच्या वयांची बेरीज 24 वर्ष असल्यास चिन्मयचे वय किती ?

A) 16 वर्ष B) 6 वर्ष C) 12 वर्ष D) 18 वर्ष

82. सीता व गीता यांच्या आजच्या वयांचे गुणोत्तर 6:5 आहे. दोन वर्षापूर्वी त्यांच्या वयाचे गुणोत्तर 5:4 होते, तर सीताचे आजचे वय किती ?

A) 10 वर्ष B) 12 वर्ष C) 15 वर्ष D) 18 वर्ष

83. 1 मार्च 1997 रोजी शनिवार होता. तर 1 जुलै 1997 रोजी कोणता वार असेल ?

A) बुधवार B) गुरुवार C) मंगळवार D) सोमवार



Scanned with OKEN Scanner

56. BS-IV, BS-VI ही मानके कशाच्या संदर्भात वापरले जातात ?

A) वाहनातून निघणारे उत्सर्जन / प्रदुषके B) वाहनाचा रजिस्ट्रेशन नंबर

C) वाहनाचा बांधा आणि शक्ती D) वाहनाचा वेग

57. L.M.V. चा संपूर्ण अर्थ काय आहे ?

A) Large Motor Vehicle B) Long Motor Vehicle

C) Light Motor Vehicle D) Limited Moto Vehicle

58. अवैध प्रवासी वाहतुक केल्यास अथवा आसन क्षमतेपेक्षा जास्त प्रवाश्यांची वाहतुक केल्यास मोटार वाहन कायद्यातील खालीलपैकी कोणत्या कलमान्वये कारवाई होते ?

A) कलम 65/192 B) कलम 66/192 अ C) कलम 184/188 D) यापैकी नाही.

59. तुम्ही इलेक्ट्रीक वाहन कसे ओळखाल ?

A) वाहनाच्या रंगावरुन B) वाहनाच्या वेगावरुन

C) वाहनाची नंबर प्लेट पाहुन D) असे ओळखणे शक्य नाही

60. मोटार वाहन कायदा मध्ये हेल्मेट वापरण्याबाबत कोणत्या कलमात उल्लेख आहे ?

A) 130 B) 129 C) 133 D) 141

61. "ब्लॅक स्पॉट" ही संकल्पना कशाशी संबंधीत आहे ?

A) रस्त्यावरील वारंवार अपघात होणारे ठिकाण B) वारंवार विद्युत प्रवाह बंद होण्याचे ठिकाण

C) चालकाला थांबवुन लुट होण्याची शक्यता असलेले ठिकाण D) यापैकी नाही

62. त्रिकोणातील चिन्हे कोणत्या प्रकारची असतात ?

A) सक्तीची B) बंधनकारक C) माहिती दर्शक D) सावधान करणारे

63. ओडोमीटर काय दाखवते ?

A) वाहनाचा वेग B) वाहनाने प्रवास केलेले एकूण अंतर

C) अ आणि ब दोन्ही D) वरील पैकी काहीही नाही

64. ट्राफिक सिग्नलचा लाल दिवा लागलेला असेल तर त्याचा अर्थ काय होतो ?

A) वाहन थांबवावे. B) समोरच्या वाहनाला उजवीकडून ओव्हरटेक करावे.

C) वाहन उजवीकडे वळवावे. D) जर सिग्नलवर वाहन नसेल तर जावे

65. अपघात प्रसंगी वैद्यकीय आपातकालीन स्थितीत खालीलपैकी कोणता दूरध्वनी क्रमांक रुग्णवाहिका बोलविण्यासाठी वापराल ?

A) 101 B) 197 C) 108 D) 131

66. कोणत्या वाहनाला ओव्हरटेक करताना अधिक सावधगिरी बाळगणे आवश्यक आहे ?

A) 'L' चिन्हांकित वाहने B) मंद गतीची वाहने C) हलकी वाहने D) वरीलपैकी काहीही नाही.

67. हँड ब्रेकचा उपयोग कशासाठी करतात ?

A) वेग कमी करण्यासाठी B) अचानक ब्रेक लावण्यासाठी

C) वाहन पार्क करण्यासाठी D) यापैकी नाही.

68. मोटार वाहनाच्या बाजूचा आरसा कोणत्या प्रकारचा असतो ?

A) अंर्तवक्र B) बर्हिवक्र C) पारदर्शक D) यापैकी नाही

69. रात्रीच्या वेळी जेव्हा रस्त्याच्या कडेला वाहन पार्क केले असेल तेव्हा...

A) वाहन लॉक करावे. B) लायसन्स धारक व्यक्तिने वाहन चालकाच्या सीटवर बसावे.

C) पार्कींग दिवे चालू करावेत. D) वाहनाचे कोणतेही दिवे चालू करु नये.



Scanned with OKEN Scanner

99. उत्कृष्ट गाण्याच्या गटात तेलगु भाषेतील 'आर.आर.आर'या चित्रपटातील 'नाटू नाटू' या गाण्याला ऑस्कर पुरस्कार मिळाला. आर.आर.आर. या चित्रपटाचे दिग्दर्शक कोण आहेत ?

A) राणा दग्गुबती B) प्रशांथ नील C) अल्लुरी सितारामा राजू D) एस.एस. राजामौली

100. 'क्रांतीचा जयजयकार' या गीताचे कवी कोण आहेत ?

A) कुसुमाग्रज B) राजा बढे C) वि.वा.शिरवाडकर D) ग.दि. माडगुळकर

---

कच्चे कामासाठी [For Rough Work]

आतापर्यंत झालेल्या सर्व प्रश्नपत्रिका डाऊनलोड करण्यासाठी या बॉक्समध्ये क्लिक करून आपले टेलिग्राम चॅनेल जॉईन करा.

Scanned with OKEN Scanner

पोलिस आयुक्त मुंबई

Set-C

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | B | 26 | A | 51 | A | 76 | D |
| 2 | B | 27 | B | 52 | D | 77 | B |
| 3 | A | 28 | A | 53 | B | 78 | C |
| 4 | A | 29 | C | 54 | B | 79 | D |
| 5 | B | 30 | B | 55 | B | 80 | B |
| 6 | C | 31 | B | 56 | A | 81 | D |
| 7 | D | 32 | A | 57 | C | 82 | B |
| 8 | C | 33 | D | 58 | B | 83 | C |
| 9 | D | 34 | C | 59 | C | 84 | D |
| 10 | A | 35 | D | 60 | B | 85 | C |
| 11 | C | 36 | C | 61 | A | 86 | B |
| 12 | A | 37 | B | 62 | D | 87 | B |
| 13 | B | 38 | D | 63 | B | 88 | C |
| 14 | A | 39 | C | 64 | A | 89 | C |
| 15 | C | 40 | B | 65 | C | 90 | C |
| 16 | B | 41 | B | 66 | A | 91 | D |
| 17 | C | 42 | B | 67 | C | 92 | A |
| 18 | A | 43 | A | 68 | B | 93 | A |
| 19 | C | 44 | B | 69 | C | 94 | C |
| 20 | D | 45 | C | 70 | B | 95 | B |
| 21 | B | 46 | C | 71 | D | 96 | A |
| 22 | C | 47 | B | 72 | D | 97 | B |
| 23 | C | 48 | B | 73 | D | 98 | C |
| 24 | D | 49 | C | 74 | B | 99 | D |
| 25 | A | 50 | A | 75 | C | 100 | A |